# "माळी" पदाकरीता भरती प्रक्रिया - २०२५

अर्ज साध्या पोस्ट द्वारे/कुरीयर द्वारे/किंवा हस्ते (By hand) स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच दि. २३/०४/२०२५ तारखे नंतर या कार्यालयास प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. उपरोक्त अर्ज समाविष्ट असलेल्या लिफाफ्यावर "**माळी पदासाठी अर्ज**" असे स्पष्टपणे लिहीणे आवश्यक आहे.

सदर प्रक्रिये दरम्यान घेतल्या जाणाऱ्या चाळणी परिक्षा(घेतल्यास), प्रात्यक्षिक परिक्षा आणि मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर राहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (**Shortlisting**) सर्व अधिकार **निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा** यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

## अ) पात्रता

१. **उमेदवार भारताचा नागरिक असावा.**

२. **शैक्षणिक अर्हता :-**

* उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाचा 'माळी' कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा किंवा किमान ०१ वर्षाचा बगीचे, हिरवळी, वनस्पती आणि झाडे इत्यादी सुस्थितीमध्ये ठेवण्याचा शासकीय/निमशासकीय/ मान्यताप्रमाप्त/नामांकित/संस्थाचा कंत्राटी पद्धती किंवा बाहययंत्रणेमध्ये करार पद्धतीवर अनुभव असावा.
* उमेदवार किमान **सातवी** इयता उत्तीर्ण असावा.
* उमेदवारास मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.
* उमेदवाराची शरीरयष्टी निरोगी व सुदृढ असावी, जेणेकरुन त्यापदावरील कर्तव्य तो पार पाडू शकेल.

३. **वयोमर्यादा :-**

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| खुला | १८ वर्षे | ३८ वर्षे |
| मागासवर्गीय | १८ वर्षे | ४३ वर्षे |
| न्यायालयीन किंवा शासकीय कर्मचारी | १८ वर्षे | लागू नाही. |

४. **माळी हे एकाकी पद (Isolated Post) असून सदर पदास भविष्यात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत याची उमेदवाराने नोंद घ्यावी.**

## ब) पात्र उमेदवारांच्या अटी

१) उमेदवाराचे चारित्र्य आणि वर्तणुक चांगली असावी.

२) उमेदवार करार करण्यास सक्षम असावा.

३) उमेदवारास कोणतेही न्यायालय/एम.पी.एस.सी./यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजीत केलेल्या परिक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकलेले नसावे किंवा अपात्र ठरविलेले नसावे.

४) उमेदवारास नैतिक अध:पतनाच्या गुन्हयासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा त्यास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविलेले नसावे किंवा उमेदवारा विरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

५) उमेदवार किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

६) उमेदवाराने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे उमेदवारीसाठी निवड समिती किंवा समितीच्या सदस्यांवर कोणत्याही प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केलेला नसावा.

७) उमदेवारास हयात असलेल्या पत्नी/पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

८) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमूळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## क) अर्ज भरण्याचे शुल्क

१) सदर भरती पक्रियेसाठी अर्ज शुल्क **रुपये १००/- (रुपये शंभर मात्र) (सर्व प्रवर्गासाठी)** एवढे असेल.

२) अर्ज शुल्क हे "DISTRICT AND SESSIONS COURT, WARDHA" यांच्या नावे काढलेली रुपये १००/- (रुपये शंभर मात्र) ची पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) स्वरुपात सादर करावे व ते **परिशिष्ट—अ मधील अर्जासह पाठविण्यात यावा.**

३) अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४) अर्ज शुल्क ना-परतावा (Non-Refundable) असेल.

## ड) निवड प्रक्रिया

आलेल्या अर्जांची छानननी केल्यानंतर अल्प सूची (Short List) प्रमाणे पात्र उमेदवारांना निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| अ.कं. | मुल्यांकन पद्धती | एकूण गुण |
|---|---|---|
| १. | * चाळणी परिक्षा | ३० |
| २. | प्रात्यक्षिक परिक्षा<br>(उद्यान, बागेच्या देखभाली संदर्भात)<br>(किमान पात्रता गुण - १५) | ३० |
| ३. | वैयक्तिक मुलाखत(Interview) | २० |
| ४. | **निवड प्रक्रियेचे एकूण गुण** | **५०/८०** |

*** जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयास आवश्यक वाटल्यास 'माळी' पदासाठी उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या लक्षात घेता अल्प सूची (Short List) तयार करण्याचे उद्देशाने जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा हे उमेदवारांची चाळणी परिक्षा घेण्याचा अधिकार स्वत: कडे राखून ठेवत आहे.**

**'माळी' पदासाठी चाळणी परिक्षा घेण्यात आल्यास सदर परिक्षा ३० गुणांची असेल व सदर परिक्षेचा कालावधी हा २० मिनिटांचा असेल व सदर परिक्षेचे स्वरुप "प्रश्न उत्तराच्या" स्वरुपात असेल.**

सदर परिक्षेमध्ये इतिहास, नागरिकशास्त्र, भुगोल, क्रिडा, साहित्य, सामान्य विज्ञान, चालू घडामोडी, दैनंदिन वापरातील इंग्रजी शब्द व माळी पदासंबंधीत माहितीवर आधारीत असेल.

**अर्जांची छाननी केल्यानंतर सातपट** उमेदवारांना खाली नमुद केलेल्या प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविले जाईल **किंवा जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांनी चाळणी परीक्षा घेण्याचे ठरविल्यास,** चाळणी परिक्षेमध्ये गुण प्राप्त केल्यानंतर काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या सातपट उमेदवारांना खाली नमुद केलेल्या प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविले जाईल. १:७ गुणोत्तर राखण्यासाठी अल्पसुचीमधील शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतके गुण एकापेक्षा जास्त उमदेवारांनी मिळविले असतील तर, अशा सर्व उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीसाठी (Interview) बोलाविले जाईल.

चाळणी परिक्षा (घेतल्यास) व प्रात्यक्षिक परिक्षा चाचणीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या ३ पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. १:३ गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

<u>सुचना</u> :-

१. चाळणी परीक्षा घेतल्यास अनुत्तीर्ण झालेले उमेदवार उर्वरित प्रक्रियेसाठी अपात्र ठरतील. चाळणी परीक्षा न घेतल्यास प्रात्यक्षिक चाचणीत अनुत्तीर्ण झालेले उमेदवार उर्वरित प्रक्रियेसाठी अपात्र ठरतील.

२. वरिल सर्व परिक्षांसाठीचे वेळापत्रक व निकाल जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे अधिकृत संकेतस्थळावर (www.wardha.dcourts.gov.in) व सुचना फलकावर (Notice Board) वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर उमेदवारांनी नियमितपणे अधिकृत संकेतस्थळाला भेट देत राहावे.

३. उमेदवारांना असे सूचित करण्यात येते की, परीक्षेकरीता तसेच मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

४. प्रात्यक्षिक परीक्षा तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा-या उमेदवारांनी स्वत:चे मुळ फोटो प्रमाणपत्र (Photo ID) उदा. मतदान कार्ड, पॅन कॉर्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा आणावा.

५. उमेदवाराने अर्जासोबत पोस्टल ऑर्डर (Postal Order) **किंवा** डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) वगळता कोणतेही कागदपत्रे जोडू नये.

**इ) जे उमेदवार वैयक्तिक मुलाखतीसाठी पात्र ठरतील त्यांनी वैयक्तीक मुलाखतीसाठी येतांना खालील कागदपत्रांच्या स्वत: प्रमाणित** (Self-attested) केलेल्या छायांकित प्रती सादर कराव्यात. तसेच सोबत मुळ प्रती तपासणीसाठी आणाव्यात.

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/सक्षम प्राधिकारणाने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र/एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC)

२) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला (७वी, १०वी, १२वी किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून घेतलेली पदवी, इत्यादी)

३) उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापिठाचा 'माळी' कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचा दाखला व उमेदवाराला किमान ०१ वर्षाचा बगीचे, हिरवळी, वनस्पती आणि झाडे इत्यादी सुस्थितीमध्ये ठेवण्याचा पुर्वानुभव असल्याचा दाखला.

४) जाहिरात प्रसिद्धी नंतरची तारिख असलेले **दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी** दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा पत्ता व फोन नंबरसह) **(परिशिष्ट 'ब')**

५) लहान कुटूंबाबाबत स्वयं घोषणापत्र (Self Declaration) **(परिशिष्ट 'क')**

६) सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला. (केवळ मागासवर्गीयांसाठी)

७) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

८) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

९) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

१०) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदललेले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज, उदाहरणार्थ शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत, इत्यादी.

११) आधार कार्ड.

१२) संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह

१३) न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

## फ) उमेदवारांकरीता अतिरिक्त सूचना

१) अर्ज विहित नमुन्यातच सादर करावा.
**(जाहिरातीसोबत दिलेल्या परिशिष्ट 'अ' नमुन्यात)**

२) अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

३) उमदेवाराने अर्ज भरतांना संपूर्ण नांव, पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी (E-Mail), जन्म तारिख त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या वैध कागदपत्रानुसार अचूक रित्या नमूद करावे.

४) माळी पदासाठी इयत्ता ७वी मधील गुण नमूद करणे अनिवार्य असेल. जर उमदेवार इयत्ता ७वी ची परिक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १०वी किंवा १२वी असेल व उमेदवाराकडे इयत्ता ७वी चे गुणपत्रक नसेल तर उमेदवाराने अर्ज भरतांना इयत्ता ७वी करीता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकुण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी.

५) उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्ज सादर करण्याच्या दिवशी धारण करीत असलेली अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१. ७वी

२. एस.एस.सी. (S.S.C)

३. एच.एस.सी. (H.S.C) किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापिठातून प्राप्त केलेली पदवी.

४. अर्ज दाखल करतेवेळी उमेदवार धारण करित असलेली उच्च शैक्षणिक पात्रता नमूद करणे बंधनकारक राहील.

६) काही शाळांच्या गुणपत्रिका टककेवारी ऐवजी ग्रेडच्या स्वरुपात दिल्या जातात, या प्रकरणात, उमेदवारांनी ऑफलाईन अर्ज भरण्यापुर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टककेवारी असलेले गुणपत्रक संबंधीत शाळेकडून मिळवावे आणि ते गुण उपरोक्त रकान्यात दिलेल्या सूचनेनुसार भरावे. सदर गुणपत्रक अर्जासोबत पाठवावे.

७) उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती दयावी. तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास, तसे अर्जात नमूद करावे.

८) उमेदवाराने पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) नंबर आणि त्याचा दिनांक अर्जात नमूद करावा. सदरहु मुळ (Original) पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडावे.

९) अर्ज शुल्क केवळ पोस्टल ऑर्डर (Postal Order) किंवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) स्वरुपात स्विकारले जाईल. डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त इतर कुठल्याही पद्धतीने केलेल्या अर्ज शुल्काचा विचार केला जाणार नाही आणि तो अर्ज नाकारला जाईल.

१०) उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास शुल्कासह उमेदवाराचा शेवटचा अर्ज विचारात घेतला जाईल.

११) मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करते वेळी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी सोबत आणाव्यात.

१२) उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता आणि निकष पुर्ण केला असतील तरच अर्ज स्वीकारला जाईल.

१३) सदरहू पदे जशी-जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१४) उमेदवाराने अर्जाचा नमुना जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धाच्या संकेत स्थळावरुन (www.wardha.dcourts.gov.in) डाऊनलोड करुन घेवून केवळ ए-४ आकाराच्या चांगल्या दर्जाच्या कागदावर सुस्पष्टपणे टंकलिखीत अगर संगणकीकृत टायपींग करुन **दि. २३ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत** किंवा त्याआधी नमुद केल्याप्रमाणे स्पीड पोस्टाने पोहचेल असे पाठवावे.

१५) उमेदवाराने अर्जा मधील फोटोच्या रकान्यामध्ये स्वत:चे नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे. स्वाक्षरीची सुरुवात सदर छायाचित्रावर करुन काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशाप्रकारे बॉलपेनने स्वाक्षरी करावी.

१६) उमदेवार जर शासकीय सेवेत असेल तर त्यांचा उमेदवारीचा विचार होण्यास विभागास कोणतीही हरकत नाही असे विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांचे कडुन "नाहरकत प्रमाणपत्र" घ्यावे. त्यानंतर मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, मुलाखतीच्या वेळेस हे मुळ प्रमाणपत्र सादर करावे. **परंतु, उमदेवाराने आपला अर्ज विभागप्रमुख किंवा कार्यालयप्रमुख यांचे मार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.**

१७) अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज जो उमदवाराने सादर केलेल्या तपशिलामुळे त्यास पदासाठी अपात्र ठरविल असा अर्ज बाद ठरविला जाईल आणि त्याबाबत कोणतीही तक्रार किंवा उजर ऐकला जाणार नाही.

## ग) उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना :-

१) जाहिरातीला अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमदेवाराची शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्ता तसेच माळी कामाच्या अनुभवानूसार अल्पसूची करण्याचे सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

२) भरती प्रक्रिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

३) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती लपवुन ठेवल्याचे निर्देशनांस आल्यास उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास उमेदवारास पदावरुन कोणतीही पुर्व सूचना न देता काढून टाकण्यात येईल.

४) अल्पसुचित समाविष्ट उमेदवार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला प्रात्यक्षिक परिक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पुर्वी उमदेवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

५) केवळ अर्ज दाखल केला यावरुन मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हाच सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

६) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते. असा बदल वेळोवेळी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांच्या अधिकृत संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केला जाईल. त्याकरीता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळास (www.wardha.dcourts.gov.in) वेळोवेळी भेट द्यावी.

७) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस प्रात्यक्षिक परिक्षा व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा कडून याबाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

८) उमेदवाराची चाळणी परिक्षा(घेतल्यास), माळी कामाची प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने मुलाखतीच्या वेळेस सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवाराची मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या गुणवत्तेच्या आधारावर ठरविण्यात येईल.

९) पात्र उमेदवारांना चाळणी परिक्षा(घेतल्यास), प्रात्यक्षिक परिक्षा तसेच वैयक्तिक मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्व:खर्चाने हजर राहावे लागेल.

१०) चाळणी परिक्षा(घेतल्यास), प्रात्यक्षिक परिक्षा तसेच वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांनी स्वत:चे मुळ ओळखपत्र (Identity Card) **उदा. :-** मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा आणावा.

११) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व त्यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२) निवड यादीतील उमेवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर उमेदवाराचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

१३) निवड यादीतील उमदेवारांची नियुक्ती सुरुवातीला परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्धल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

१४) उमेदवारांची निवड ही चाळणी परिक्षा(घेतल्यास), प्रात्यक्षिक परिक्षा व वैयक्तीक मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

१५) निवड सुची/प्रतिक्षा सुची ही मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेस अधीन राहून, दोन वर्षाच्या कालावधी करीता अथवा मा. उच्च न्यायालय विहित करेल अशा कालावधीसाठी वैध राहील.

१६) निवड झालेल्या उमेदवारांची सेवा ही मा. उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमाप्रमाणे असेल.

१७) उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार अंशदान निवृत्ती वेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१८) उमेदवारांची सेवा त्यांच्याबाबत संबंधीत पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतल्या जाणाऱ्या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रास अधिन राहून असेल.

१९) प्रतिक्षा यादी ही केवळ निवड यादीतून उमदेवार पदावर रुजू होण्यासाठी दिलेल्या विहित मुदतीत रुजू न झाल्यामुळे रिक्त झालेल्या किंवा निवड यादीतील उमेदवार पदावर रुजु झाल्यास परंतु उमेदवाराने निवड यादीच्या वैधता कालावधीत राजीनामा दिल्यास अगर अन्य कोणत्याही कारणांमुळे निवड यादीतील निवड झालेल्या उमेदवाराचे पद रिक्त झाल्यास वापरता येईल.

२०) उमेदवाराने 'सफाईगार' किंवा 'माळी' या दोन पदांपैकी कोणत्याही एकाच पदाकरीता अर्ज करावा.

२१) या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

आदेशावरुन

दिनांक : ०७ एप्रिल, २०२५

प्र. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा